# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः04.10.2025** **वारःशनिवार**

---

1. विविध युवा-केंद्रित उपक्रमांचं आज पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन
2. खासगी रेडिओ प्रसारकांसाठी डिजिटल रेडिओ प्रसारण धोरणाकरिता शिफारशी जाहीर
3. जीएसटी सवलतींमुळं नवरात्रीत मोठी उलाढाल
4. उर्वरित सर्व इस्रायली बंधकांना सोडण्यास हमासची सहमती
5. अहमदाबाद कसोटीत भारत भक्कम स्थितीत आणि
6. शक्ति चक्रीवादळामुळं महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीला इशारा

**पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्ली इथून 62 हजार कोटीं रुपयांहून अधिक खर्चाच्या विविध युवा-केंद्रित उपक्रमांचं उद्घाटन करतील. युवा कौशल्य विकासासाठी या ऐतिहासिक उपक्रमात, पंतप्रधान देशभरातील एक हजार सरकारी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या आधुनिकीकरणाकरिता पीएम-सेतूचा शुभारंभ करतील. बिहारमधील पाच लाख पदवीधरांना दोन वर्षांसाठी एक हजार रुपये मासिक भत्ता देण्यासबंधी सुधारित - 'मुख्यमंत्री निश्चय स्वयंम सहाय्य भत्ता योजना'- देखील मोदी सुरू करतील. उद्योग-केंद्रित अभ्यासक्रम आणि व्यवसायिक शिक्षणाला चालना देण्यासाठी ते बिहारमधील जन नायक करपूरी ठाकूर कौशल्य विद्यापीठाचं उद्घाटन करतील. बिहारमधील चार विद्यापीठांमध्ये नवीन शैक्षणिक आणि संशोधन सुविधांची पायाभरणी तसंच बिहटा इथल्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था अर्थात एनआयटी पटनाच्या नवीन इमारतीचं लोकार्पण देखील मोदींच्या हस्ते करण्यात येईल. याव्यतिरिक्त, 34 राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या नवोदय विद्यालयं आणि एकलव्य मॉडेल निवासी शाळांमध्ये स्थापित एक हजार दोनशे व्यावसायिक कौशल्य प्रयोगशाळांचं पंतप्रधान उद्घाटन करतील.

**TRAI**

भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण अर्थात TRAI नं खासगी रेडिओ प्रसारकांसाठी डिजिटल रेडिओ प्रसारण धोरण तयार करण्याबाबत शिफारशी जाहीर केल्या आहेत. दिल्ली, मुंबई, कोलकता आणि चेन्नई या चार A+ श्रेणीतील शहरांमध्ये आणि हैदराबाद, बंगळुरू, अहमदाबाद, सुरत, पुणे, जयपूर, लखनऊ, कानपूर आणि नागपूर या नऊ A श्रेणीतील शहरांमध्ये डिजिटल रेडिओ प्रसारण सेवा सुरू करण्यासाठी राखीव किंमत निश्चित करण्याची शिफारस प्राधिकरणानं केली आहे. नवीन प्रसारकांनी सिमुलकास्ट पद्धतीनं डिजिटल रेडिओ सेवा सुरू कराव्यात, अशी शिफारस TRAI नं केली आहे. विद्यमान ॲनालॉग एफएम रेडिओ प्रसारकांना स्वेच्छेनं सिमुलकास्ट पद्धतीमध्ये

रूपांतरित करण्याची परवानगी द्यावी, डिजिटल रेडिओ प्रसारणासाठी अधिकृततेचा कालावधी 15 वर्षे असावा अशी शिफारस देखील केली आहे.

**<u>नवरात्र</u>**

भारताच्या ग्राहक अर्थव्यवस्थेत गेल्या दशकातील नवरात्रामधील सर्वाधिक उलाढाल यावेळी दिसून आली. सरकारनं केलेल्या नव्या पिढीच्या जीएसटी सुधारणांमुळं ही उलाढाल झाली आहे. करांचे दर कमी झाल्यामुळं उत्पादनं खरेदी करणं अधिक सुलभ झालं आहे. या उपाययोजनांमुळं किंमती कमी होण्यासोबतच ग्राहकांच्या आकांक्षाही वाढल्या आहेत. कुटुंबांना नवीन वाहनांची खरेदी, घरगुती उपकरणांमध्ये गुंतवणूक आणि जीवनशैलीच्या वस्तूंवर अधिक मुक्तपणे खर्च करणं शक्य झालं आहे. परिणामी उत्सवाचा आनंद विक्रमी वापरामध्ये रुपांतरित झाला आहे. प्रमुख कार उत्पादक कंपन्यांकडून उपलब्ध असलेल्या आकडेवारीनुसार, नवरात्र काळात विक्रीत लक्षणीय वाढ दिसून आली. गेल्या वर्षीच्या याच उत्सवाच्या कालावधीच्या तुलनेत ही वाढ 60 टक्क्यांपासून 100 टक्क्यांपर्यंत आहे. याव्यतिरिक्त, आघाडीच्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स कंपन्यांकडून मिळालेल्या आकडेवारीनुसार, या नवरात्रात मागील वर्षीच्या तुलनेत विक्रीमध्ये दोन अंकी वाढ दिसून आली.

**<u>निवडणूक आयोग-केंद्रीय निरीक्षक</u>**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी केंद्रीय निरीक्षकांना राजकीय पक्ष, उमेदवार आणि मतदारांच्या तक्रारींचं निवारण करण्यासाठी पूर्णपणे उपलब्ध राहण्याचे निर्देश दिले आहेत. बिहारच्या आगामी सार्वत्रिक निवडणुका आणि काही राज्यांमधील पोटनिवडणुकांसाठी तैनात करण्यात येणाऱ्या केंद्रीय निरीक्षकांना नवी दिल्लीत एका बैठकीत माहिती देताना कुमार म्हणाले की, निवडणूक निरीक्षक हे लोकशाहीचे दीपस्तंभ आहेत. निरीक्षकांनी मतदान केंद्रांना भेट द्यावी तसंच मतदारांच्या सोयीसाठी आयोगानं अलिकडंच हाती घेतलेल्या उपक्रमांची अंमलबजावणी सुनिश्चित करण्याचे निर्देश त्यांनी दिले. केंद्रीय निरीक्षकांना सर्व निवडणूक कायदे, नियम आणि मार्गदर्शक तत्त्वांचा परिचय करुन घेणं, थेट जागेवरुन माहिती देणं आणि त्यांचं काटेकोर आणि निष्पक्ष पालन सुनिश्चित करण्यास सांगण्यात आलं आहे. या बैठकीत 287 आयएएस अधिकारी, 58 आयपीएस अधिकारी आणि इतर सेवांमधील 80 अधिकारी उपस्थित होते.

**<u>बिहार - निवडणूक आयोगाचा दौरा</u>**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या नेतृत्वाखालील संपूर्ण निवडणूक आयोगाचं पथक आगामी बिहार विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी दोन दिवसांच्या पाटणा दौऱ्यावर आलं आहे. या शिष्टमंडळात निवडणूक आयुक्त डॉक्टर सुखबीर सिंग संधू आणि डॉक्टर विवेक जोशी यांचा समावेश आहे.

**<u>गाझा</u>**

हमासनं उर्वरित सर्व इस्रायली बंधकांना सोडण्यास सहमती दर्शविली आहे. परंतु अमेरिकेच्या शांतता योजनेत नमूद केलेल्या अनेक प्रमुख मुद्द्यांवर पुढील वाटाघाटी करण्याची आपली इच्छा असल्याचं देखील म्हटलं आहे. एका निवेदनात, हमासनं म्हंटलं आहे की बंधकांच्या देवाण-घेवाणीसाठी योग्य अटी पूर्ण झाल्या तर अध्यक्ष ट्रम्प यांच्या प्रस्तावात समाविष्ट असलेल्या सूत्रानुसार सर्व जिवंत आणि मृत इस्रायली कैद्यांना सोपवण्यास ते सहमत आहेत. परंतु

गाझाच्या भविष्याबद्दल आणि पॅलेस्टिनींच्या हक्कांबद्दलच्या इतर मुद्द्यांवर पुढील वाटाघाटी करण्याचा हमासचा प्रयत्न असल्याचं दिसतं. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हमासला, शांतता योजना स्वीकारावी अथवा विनाशाला सामोरं जाण्यासाठी रविवारपर्यंत अंतिम मुदतीचा इशारा दिल्यानंतर काही तासांतच हमासद्वारे ही घोषणा करण्यात आली. हमासनं आपला प्रतिसाद सादर केल्यानंतर, ट्रम्प म्हणाले की हा दहशतवादी गट कायमस्वरूपी शांततेसाठी तयार आहे असा आपला विश्वास आहे. तत्पूर्वी ट्रंप यांनी बंधकांना सुरक्षितपणे आणि लवकर बाहेर काढता येण्याच्या उद्देशानं इस्रायलला गाझावरील बॉम्बहल्ले ताबडतोब थांबवण्याचं आवाहन केलं होतं.

**<u>शिवराज - कृषी विद्यापीठ</u>**

कृषी शिक्षणासाठी मोठा दिलासा देत, केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी कृषी विद्यापीठांमधील पदवीच्या 20 टक्के जागा अखिल भारतीय स्पर्धात्मक परीक्षेद्वारे भरण्याची घोषणा केली आहे. कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं सांगितलं की, भारतीय कृषी संशोधन परिषद ही परीक्षा एक राष्ट्र, एक शेती, एक संघ या भावनेनुसार घेईल. या निर्णयामुळं बारावीमध्ये जीवशास्त्र, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, गणित किंवा कृषी विषयाचं शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना CUET-ICAR राष्ट्रीय प्रवेश परीक्षेतून प्रवेश घेता येईल. या निर्णयामुळं देशभरातील विद्यार्थ्यांसाठी प्रवेश सोपे आणि एकसमान होतील असं चौहान यांनी बातमीदारांना सांगितलं.

**<u>अमली-नष्ट</u>**

महाराष्ट्रात, ठाणे, पालघर आणि मीरा भाईंदर वसई विरारच्या पोलिस पथकांनी केलेल्या संयुक्त कारवाईत जप्त केलेले 147 कोटी रुपयांचे हेरॉइन, कोकेन, मेफेड्रोन तसंच कोडीन-आधारित कफ सिरप यांसारखे अंमली पदार्थ नष्ट करण्यात आले. अधिकाऱ्यांनी काल दिलेल्या माहितीनुसार, जप्त केलेल्या अवैध पदार्थांमध्ये अंदाजे सत्तावीस हजार लिटर कोडीन-आधारित कफ सिरपसह एक हजारपेक्षा जास्त किलोग्रॅम हेरॉइन, कोकेन आणि मेफेड्रोन असे अंमली पदार्थ समाविष्ट होते.

**<u>खोकल्याचे-औषध</u>**

लहान मुलांच्या आरोग्याच्या सुरक्षिततेसाठी केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी कफ सिरप आणि सर्दीवरील औषधांच्या वापराबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शक तत्त्वं प्रकाशित केली आहेत. या सूचनांनुसार, लहान मुलांना ही औषधे देताना बालरोग तज्ज्ञ आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी विशेष काळजी घ्यावी असे निर्देश देण्यात आले आहेत. दोन वर्षांखालील मुलांना कफ आणि सर्दीवरील कोणतीही औषधे देऊ नयेत असं मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. तसंच, पाच वर्षांखालील मुलांसाठी या औषधांची सामान्यतः शिफारस केलेली नाही. कारण, लहान मुलांमधील तीव्र कफ आणि सर्दीचे बहुतांश आजार स्वतःहून बरे होतात आणि त्यासाठी औषधांची गरज पडत नाही.

**<u>भावे पुरस्कार</u>**

ज्येष्ठ अभिनेत्री नीना कुलकर्णी यांना यंदाचा आद्य नाटककार विष्णुदास भावे पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्काराचं हे 58 वं वर्ष असून, येत्या पाच नोव्हेंबरला, रंगभूमी दिनी या पुरस्काराचं वितरण होणार असल्याची माहिती अखिल महाराष्ट्र नाट्य विद्यामंदिर समितीचे अध्यक्ष डॉक्टर शरद कराळे यांनी काल सांगलीमध्ये वार्ताहर परिषदेत

दिली. गौरवपदक, पंचवीस हजार रुपये, स्मृतीचिन्ह, शाल असं पुरस्काराचं स्वरुप आहे. या पुरस्कारामुळं कृतकृत्य झाल्याची भावना नीना कुलकर्णी यांनी आकाशवाणीशी बोलताना व्यक्त केली.

**क्रिकेट**

अहमदाबाद क्रिकेट कसोटीत भारतानं वेस्ट इंडिजवर पहिल्या डावात 286 धावांची भक्कम आघाडी घेतली आहे. दुसऱ्या दिवसअखेर भारताच्या पहिल्या डावात पाच बाद 448 धावा झाल्या. जडेजा 104 धावांवर खेळत आहे. वेस्ट इंडिजनं पहिल्या डावात 162 धावा केल्या आहेत.

**हवामान**

अरबी समुद्रात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यांचं शक्ती या चक्रीवादळात रुपांतर झालं असून त्याच्या प्रभावामुळं आजपासून पुढचे चार दिवस महाराष्ट्राच्या विविध भागात मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. या काळात किनारपट्टीवर जोरदार वारे वाहतील, समुद्रही खवळलेला असेल, त्यामुळं मासेमारांनी समुद्रात उतरू नये असा इशारा हवामान विभागानं दिला आहे. या चक्रीवादळाच्या प्रभावामुळं कोकणासह विदर्भ आणि मराठवाड्यातही मुसळधार पाऊस पडेल असा अंदाज आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.